पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 04/02/2020 (मंगळवार)
(सकाळ)

---

## दुकानात चोरी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 3 कि.मी अंतरावर टि.आर.एस ऑटो मोबाईल शोरूम कांद्री कन्हान येथे दिनांक 02/02/2020 चे 24:00 वा. ते दिनांक 03/02/2020 चे 10:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सीमा बेनीश्याम रंगारी, वय 43 वर्ष, रा. गणेश नगर, कन्हान यांचे टि.आर.एस ऑटो मोबाईल दुकानाचे शटरचे कुलूप अज्ञात आरोपीने तोडून दुकानात प्रवेश केला. तसेच आरोपीने दुकानातील कपाटामध्ये ठेवलेले नगदी 15,000/–रू. व सीसीटीव्ही फुटेजची डी.वी.आर मशीन कि. 13,000/–रू. असा एकुण कि. 28,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नझीर कुरेशी 8390632202 हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 18 कि.मी अंतरावर मौजा वडेगव येथे दिनांक 02/02/2020 चे 20:00 वा. ते दिनांक 03/02/2020 चे 06:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अरूण दामोधर मेंढे, वय 35 वर्ष, रा. वडेगाव यांच्या घराच्या दाराचा अज्ञात आरोपीने कुलूप तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने फिर्यादींच्या घरात प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेले नगदी 50,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अजय इंगळे 7304431090 हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. मौदा :– दिनांक 03/02/2020 चे 19.15 वा. दरम्यान 27 वर्षीय फिर्यादी/पीडित ही घरी चहा बनवत असतांना आरोपी नामे– साहिल उर्फ बंटी पुरूषोत्तम बोरकर, वय 23 वर्ष, रा. निंबा याने तिच्या घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच फिर्यादीने सदर बाब पतीला सांगितले असता फिर्यादीचा पती आरोपीस विचारणा करणे करिता त्याच्या घरी गेले असता आरोपीने फिर्यादीच्या पतीला मारहाण करून शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 452, 354, 323, 504, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जंगवाड हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– दिनांक 03/02/2020 चे 12:00 वा. ते 12:30 वा. दरम्यान 22 वर्षीय फिर्यादी/पीडित ही कामावरून घरी असतांना मागील एक महीण्यापासुन आरोपी नामे– निलेश गोविंदा अडकने, वय 25 वर्ष, रा. मनसर याने तिचा पाठलाग केला. तसेच आरोपीने पीडितेस फोन करून व मॅसेज केला व पाठलाग करून ''तु माझ्याशी बोलत का नाही''असे म्हणुन पीडितेस आरोपीने थापडा मारल्या व तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 452(ड), 323 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. भुते 9822566180 हे करीत आहे.

# अपघातात मृत्यू

पो.स्टे. कन्हान :–अंतर्गत 2 कि.मि. मौजा कांद्री गुरूदवारा समोर, एनएच–1 रोड येथे दिनांक 03/02/2020 चे 10:30 वा. दरम्यान फिर्यादीचा भाऊ नामे– विनोद काटोके, वय 45 वर्ष, रा. केरडी कन्हान हा त्याच्या एमएच– 40/पी– 839 क्रमांकाच्या ऑटो मध्ये रितेश मानवटकर, वय 20 वर्ष व कचराबाई मानवटकर, वय 75 वर्ष, रा. केरडी कन्हान यांना घेवुन कन्हान कडुन केरडी येथे जात होते. दरम्यान एमएच–40/बीएल–5978 क्रमांकाचा ट्रकचा आरोपीने त्याच्या ताब्यातील भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन खदान क्र. 3 कडुन मनसरचा दिशेने जात असतांना ऑटोला डाव्या बाजुस धडक दिली. या अपघातात ऑटो चालक फिर्यादीचा भाऊ विनोद काटोके यास डाव्या खांदयाला जबर मार लागला व रितेश यास डाव्या पायाच्या मांडीला किरकोळ मार लागला. तसेच कचराबाई मानवटकर यांना डोक्याला जबर मार लागल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पवन रामचंद्रजी काटोके, वय 32 वर्ष, रा. केरडी कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नझीर कुरेशी 8390632202 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर